।। श्री सद्‌गुरु प्रसन्न ।।

ज्ञानाकृतं भोजनम् ।

# पाझर अमृताचा


नोंदणी क्रमांक : MAHMAR/2004/14372

❖ वर्ष १० वे ❖ अंक ४ था ❖ अश्विन - कार्तिक शके १९३५ ❖ ५ ऑक्टोबर २०१३ ते २ डिसेंबर २०१३

**प्रकाशक व मुद्रक:**
**श्री प्रदीप कुलकर्णी**

**मालक :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर
{नोंदणी क्रमांक : E-17128 (M)}
संपर्क : ९८२०५४९४१५
Website - www.shridatt.org

**प्रकाशनस्थळ :**
**श्रीदत्त प्रकाशन,**
श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर,
डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २,
गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

**मुद्रणस्थळ :**
**सुदर्शन आर्ट प्रिंटिंग प्रेस**
१०, वडाळा उद्योग भवन, वडाळा, मुं - ३१.

संपादिका : **सौ. नीता कुलकर्णी**

संपादन सहाय्य : **सौ. प्रतिभा गोखले**
**सौ. शामला आपटे**


## अंतरंग


◆ रुचि रुचि भोजन ०२

◆ भक्तगाथा ०३

◆ अहो ऐकलतं का? ०७
- सौ. रेश्मा

◆ गोजिरवाणी ०८
- सौ. नीता कुलकर्णी

◆ भागिरथीच्या काठावर... ०९

◆ गुंजारव १ - अदिती १०

◆ शब्द तेचि छेडिता... ११
- मोहिनी

◆ गुंजारव २ १३
- शुभांगी मोकाशी

◆ तरुणाई - आरती १४

◆ उत्सव विशेष १५

## संपादकीय...✍

गुरुपौर्णिमा उत्सवापासून सुरु झालेल्या दिड महिन्याच्या उत्सवाची सांगता जन्माष्टमी उत्सवाने झाली. अनेक गुरुभक्तांनी मंदिरात पूर्णवेळ राहून तर काहींनी जाऊन येऊन हजेरी लावली. आपले आयुष्य म्हणजेही असा एक उत्सवच असतो नाही का? ज्या उत्सवात कोणी कोणी सतत सद्‌गुरूंशी संपर्कात असतात तर काही जण कधी कधीच सन्निध असतात, तर काहीजण तिकडे पाठ फिरवतात. गुरुमाऊली मात्र अखंड तेच रूप असते. म्हणून तिच्या दर्शनाने आम्हास शांत वाटते.

गुरुदेव एखाद्या कृतीतून साधकाला कसे चिंतन करावयास भाग पाडतात याचा अनुभव 'अहो ऐकलंत का?' वाचताना येईल. 'तरुणाई' तही गुरुमाऊलीशी असलेले नाते वर्णिले आहे. काही वेळा प्रत्यक्ष बोलण्यापेक्षाही पत्राद्वारे मनोगत उकलता येते याचा प्रत्यय हा लेख वाचताना येईल. गुरुदेवांचे नाते किती अनमोल आहे हे खरा गुरुभक्तच जाणतो. 'शब्द तेचि छेडिता...' यात असाच अनुभव मांडला आहे. 'भक्तगाथे' तही श्रीसस बलभीम महाराजांची खरी ओळख पटण्यास कसा वेळ लागला हेच सांगितले आहे. 'गोजिरवाणी' तील गोष्टीप्रमाणेच आपल्याला खरी सुवर्णमूर्ती पटकन सापडत नाही. कारण आपली दृष्टी ते पहात नसते. आपले स्वरूप आपणांस महाराजच दाखवितात. ते कसे आहे त्याचे वर्णन 'सदाचार' मध्ये आलेले आहे.

महाराजांच्या सांगण्याप्रमाणे जर आम्ही विचार करू लागलो व आचरणही करू लागलो तर मंदिरातील उत्सव हे चोवीस तासच असतील नाही का?

### रुचि रुचि भोजन

पारंपारिक जुने आले घेतले हळुहळू केले आलेपाक वडीला।।धृ।।
वरची माती तैशीच साले धुऊनी किसले आल्याला।।१।।
सप्रेम शर्करा तयात घातली तेणे गोडी आली वडीलाही।।२।।
ज्ञानाग्नीवरी तापविली विवेके घोटीली वडीला या।।३।।
गुरुनाथाने थापटूनी थापटूनी तयार केली वडीला।।४।।
काम क्रोधे अपचन होता मत्सराने पोट दुखता आलेपाक वडी बरे करते।।५।।
माधुरीदत्त साधक सेविती भवमुक्त होती आनंदित होत।।६।।



## भक्तगाथा...✍

याप्रमाणे बोवा देवास येथे मोठ्या आनंदात काळ घालवीत असता एके दिवशी त्यांच्या पायास नारू झाला. या दुखण्यामुळे ते फार आजारी झाले. ४/५ दिवस तापाने व वेदनांनी त्यांस इतके हैराण केले की, त्यांस काही दिवस अंथरूणावरून उठणेही फार कठीण झाले होते. अशा स्थितीत त्यांस श्रीलक्ष्मणमहाराज फार आजारी असल्याबद्दलचे पत्र आले. ते पत्र वाचताच बोवांस अत्यंत वाईट वाटले व त्यांनी गुरुमहाराजांकडे जाण्याचा एकदम बेत केला. स्वतःस नारूच्या दुखण्यामुळे जरी चालवत नव्हते तरी आपल्या बरोबर गणपतराव तांबे, सौ. कृष्णाबाई व चि. दत्तात्रय यांस घेऊन ते ताबडतोब इंदुरास गेले. बोवांस व त्यांचे बरोबर आलेल्या मंडळीस पाहताच श्रीलक्ष्मणराव महाराजांस फार आनंद झाला. बलभीमबोवा व त्यांचे बरोबर आलेली सर्व मंडळी यांनी श्रीलक्ष्मणमहाराजांस सांष्टांग नमस्कार करून त्यांच्या पायावर डोके ठेविले व महाराजांनी बोवांस उठवून त्यास गाढ आलिंगन दिले. दोघांस परमानंद होऊन प्रेमाश्रु आले. परस्परांच्या प्रकृतीविषयी व औषधोपचारांविषयी थोडे बोलणे झाल्यावर श्रीलक्ष्मणमहाराज बोवांस म्हणाले,'पहाटेवीण पाहाविती। अमृतेवीण जीवविती। नयनेवीण दाविती। कैवल्य डोळा।।' हे श्रीसद्‌गुरुचे कार्य आहे. त्यांच्याच कृपेने, 'वेदांताचे अबोलणे। सिद्धांतीचे जाणोनि नेणणे। जेथे मिळणी होय ते पावणे। कैवल्यपद।।' ही स्थिति प्राप्त होते. मात्र या पदास पावण्याकरिता 'जे जाणोनि सर्व कीजे। जे सर्वदा अभ्यासिजे। जेथ परतोनि चित्तें राहिजे। बुडी देवोनी।।' ही वागणूक विसरता कामा नये. हे 'अमृतवचन' हृदयी ठेवून त्याप्रमाणे वर्तन ठेविल्यास जीवाचें परम कल्याण होईल.' हे भाषण ऐकताच आनंद होऊन बोवांच्या शरीरावर रोमांच आले व ते महाराजांस म्हणाले,'महाराज आपल्या कृपेने आपले वचन मी कधी विसरणार नाही.' पुढे बराच वेळ गुरुशिष्यांचा प्रेमळ संवाद झाल्यावर सर्व मंडळी निद्रिस्थ झाली.

दुसरे दिवशी श्रीलक्ष्मणमहाराजांच्या प्रकृतीस जरा बरे वाटले. सर्व शिष्यगणात बोवांची वृत्ति अत्यंत नम्र व सत्त्वशील असून वेदांत, शास्त्र व अनुभव यातही त्यांचे प्राविण्य आहे असे श्रीलक्ष्मणमहाराजांस आढळून आल्यामुळे त्यांनी आपली मेखला

बोवांस अर्पण केली व सांगितले की, 'अंत:पर या देहाचा भरंवसा नाही. पिकलेले पान केव्हा गळून पडेल याचा नियम नाही. करीता दीन मुमुक्षु शरण आल्यास त्यास हाती धरण्याचे काम अत:पर तुम्ही करावे.' हे ऐकून बोवांस फार वाईट वाटले व ते महाराजास म्हणाले की, 'नाथ आपली चरणसेवा व प्रेम यावाचून या दीनास काही नको.' महाराजांनी बोवांस पुन्हा सांगितले की, 'बोवा आज्ञा स्मरून त्याप्रमाणे वागणे हीच माझी सेवा; करिता तुम्ही ती करावी. त्यातच तुमचे कल्याण आहे.' महाराजांची आज्ञा बोवांस मानावी लागली व महाराजांच्या पायावर त्यांनी साष्टांग लोटांगण घातले. महाराजांची शुश्रुषा करीत बोवा ४/५ दिवस तेथेच राहिले. पुढे श्रीलक्ष्मणमहाराजांची प्रकृति सुधारली व नंतर बोवांस गावी जाण्यास महाराजांनी अनुज्ञा दिली. सर्व मंडळीसह बोवा पुन्हा देवाशास आले.

बोवा देवाशास परत आल्यावर पुन्हा त्यांचा नित्य क्रम सुरू झाला. या समयास गणपतराव तांबे यांचे बंधु गोपाळराव यास बोवांचा फार राग आला. त्या सर्वास असे वाटले की, 'बोवांनी गणपतरावांस नादी लावून फसविले. गणपतरावांस आपला शिष्य अथवा हस्तक करून घेऊन, त्यास प्रपंच विन्मुख करून, धड प्रपंच ना धड परमार्थ अशी त्यांची स्थिति केली.' अशी गैरसमजूत तांबे यांच्या कुटुंबातील सर्व मंडळींची झाल्यामुळे ते बोवांचा द्वेष करू लागले व बोवांची संगत मुळीच धरू नये असा उपदेश गणपतरावांस करू लागले. पण गणपतरावांची स्वतःची निष्ठा बोवांवर निस्सिम असल्यामुळे कोणाचेच काही चालेना.

देवास येथील काही कुत्सित लोकांनी शहरात बोवांबद्दल अशी कंडी उठविली होती की, बोवांस मारूतीसारखे एक लहान शेपूट असून ते प्रेमाच्या जाळ्याने माणसास वश करून कुत्र्याप्रमाणे पाय चाटावयास लावतात. अशी वदंता गणपतरावांचे बंधु गोपाळराव यांच्या कानावर गेल्यामुळे त्यास गणपतरावांचे पुढे कसे होईल या संबंधी जास्तच काळजी वाटू लागली.

लोक आपणांवर नानाप्रकारचे आरोप करून आपली निंदा करतात ही गोष्ट बोवांस समजली. पण बोवांनी अशा कंड्या व कुटाळक्यांकडे कधीही लक्ष दिले नाही. ''जो निंदेते नेघे। स्तुतीं न श्लाघे। आकाश न लगे। लेपू जैसा।। तैसे निंदा आणि स्तुति। मान करूनि एके पंक्ति। विचरे प्राणवृत्ति। जनी वनी।।'' या श्रीज्ञानेश्वर



महाराजांच्या उक्तीप्रमाणे बोवांची अचलस्थिति झाल्यामुळे ते असल्या गोष्टींची पर्वाच करीत नसत.

देवास येथील रा.ब. भिडे, रा.ब. कुंटे वगैरे मोठी मोठी विद्वान मंडळी बोवासाहेबांच्या नादी लागून त्याचे पूजन, भजन करतात, त्यांना गुरु समजून त्यांची आज्ञा पाळतात. सदोदित त्यांच्या कीर्तनास जातात व त्यांच्याशी नित्य नम्र भाषणे करितात. हे ज्या वेळेस रा. गोपाळराव तांबे यांना समजले व त्यांनी ते प्रत्यक्ष पाहिले, त्या वेळेस आपण बोवांस चेटकी समजतो व गणपतरावांस त्यांनी बिघडविले असे समजतो, ही चूक आहे असे त्यांस वाटू लागले व त्यांचा बोवांविषयींचा गैरसमज दूर होऊन रोष नाहीसा झाला. आपल्या शिष्यांचे कल्याणाकरिता बोवांनी नानाप्रकारचे अपमान व त्रास सहन केला. 'तुका म्हणे तोची संत। सोशी जगाचे आघात।।'

एके दिवशी बोवांस इंदूरहून एक पत्र आले, ते पत्र फोडून पाहताच ते श्रीलक्ष्मणमहाराजांकडील असावे असे त्यास वाटले व वाचून पाहताच बोवांच्या नेत्रांतून अश्रुधारा चालल्या. पत्रात श्रीलक्ष्मणमहाराज शके १८२३ श्रावण व।। ७ स समाधिस्थ झाल्याची वार्ता होती. म्हणून बोवांस मोठा डोंगर कोसळल्यासारिखे होऊन अत्यंत दुःख झाले. 'असो, प्रभो!' तुझी मर्जी असे उद्गार त्यांचे तोंडून बाहेर पडले. ही दुःखद वार्ता त्यांनी गणपतराव व आपली पत्नी कृष्णाबाई यांस सांगितली. त्यांनाही अत्यंत वाईट वाटले व सर्वांनी इंदुरास ताबडतोब जावयाचे ठरविले. इंदूर येथील गुरुमहाराजांच्या मंदिरात जाऊन ते उतरले. गुरुभक्तमंडळींचे यथाशक्ति समाधान करून बोवांनी आपले गावी परत जाण्याचे ठरविले.

ठरल्याप्रमाणे बोवा साडे येथे मंडळीसह थोडेच दिवसात आले. तेथे कीर्तन भजन वगैरे क्रम पुन्हा पूर्ववत सुरु झाला. तेथील मंडळीस प्रथम कीर्तन, भजन वगैरे गोष्टींची फारशी आवड नसे, म्हणून घरोघरी जाऊन मंडळीस 'कथा ऐकण्यास यावे' अशी हात जोडून विनंती करून बोवा लोकांस बोलावीत असत. काही दिवस कथेसाठी दिवा, बिछायत वगैरेचा खर्च स्वतः करीत व कथेच्या शेवटी सर्वांस प्रेमाने प्रसाद देत असत. पुढे पुढे त्यांच्या कीर्तनांची चटक लोकांस बरीच लागत गेली व न बोलाविता बरीच गर्दी जमू लागली. सर्वांस बलभीमबोवांविषयी आदर व प्रेम उत्पन्न झाले. त्यांची कीर्ति आसपासच्या गावींही पसरली. दूरदूरच्या गावाहून मंडळी त्यांच्या दर्शनास व

कीर्तनास येऊ लागली. दूरदूरच्या गावी कथा करण्यास लोक बोवांस बोलवू लागले. या सुमारास रा. गणपतराव तांबे हे काही दिवसांची रजा काढून साडे मुक्कामी आले. गणपतराव आलेले पाहून बोवांस फारच आनंद झाला. या गुरुशिष्याचे प्रेमपुरस्सर व बोधपर संवाद ऐकून तेथील सर्व लोकांस त्या उभयतांविषयी आश्चर्य वाटे. साडे येथील नारायणराव कुळकर्णी, बाळकराम, सीताराम निलगे, सखाप्पावाणी, नाना पाटील वगैरे मंडळी बोवांच्या कीर्तनास व भजनास येत असत. कीर्तन ऐकून त्यांस अत्यंत आनंद होत असे. पुढे त्या सर्व मंडळींनी बोवांपासून अनुग्रह घेऊन आत्मजागृति करून घेतली.

बोवांच्या साधुत्वाची कीर्ति कर्णोपकर्णी सोनोरी, करमाळा, सोलापूर, नगर व पुणे वगैरे ठिकाणी पसरली. तेथील कित्येक मंडळी बोवांची ख्याति ऐकून बोवांच्या दर्शनास साडे येथे येत व काही दिवस राहून परत जात असत. कोणीही पाहुणे मंडळी आल्यास बोवा त्यांचा आदरसत्कार प्रेमाने करीत असत. सौ. कृष्णाबाई आपल्या कुशलतेने उत्तम स्वयंपाक करून पाहुण्यांची योग्यप्रकारे व्यवस्था ठेवीत असत. त्या उभयतांनी कोणासही आपल्या शब्दाने अथवा कृतीने यत्किंचितही दुखविले नाही. त्याचप्रमाणे बोवा केव्हाही कोणापासून कसलीच अपेक्षा करीत नसत. बोवांचे सरळ, निरपेक्ष व प्रेमळ वर्तन पाहून सर्वांस संतोष होई.

बलभीमबोवा, आपले सद्गुरु श्रीलक्ष्मणमहाराज समाधिस्थ झाल्यावर त्यांच्या पुण्यतिथीचा उत्सव साडे गावी मोठ्या उत्साहाने व प्रेमाने करीत असत. भजन, कथा, ब्राह्मणभोजन वगैरे कार्यक्रम गावकऱ्यांचे मदतीने उत्तम प्रकारे होत असे. साडे येथील बोवांचे शिष्य नाना पाटील यांची बोवांवर निष्ठा असल्यामुळे ते असल्या कार्यात प्रामुख्याने भाग घेत. नाना पाटील स्वतः श्रीमंत असून अत्यंत निरभिमानी आहेत. श्रीगुरुलक्ष्मणमहाराजांच्या पुण्यतिथीच्या उत्सवात बोवांच्या घरासमोरील अंगणात बरेच ब्राह्मण भोजनास बसले असता एकदा असा चमत्कार झाला की, इतर सर्व ठिकाणी पाऊस पडू लागला. परंतु बोवांच्या घरातील अंगणात पावसाचा एक थेंबही पडला नाही. हा चमत्कार भोजनास बसलेल्या लोकांनी व इतर जनांनी पाहताच त्यांस अत्यंत आश्चर्य वाटले व सर्वांनी भोजनोत्तर मोठ्या प्रेमाने पांडुरंगाचे भजन केले.

पान नं. १२ वर



# अहो ऐकलतं का?...

**- सौ. रेश्मा**

## जाम? नव्हे मजा!!

आपण नेहमी म्हणतो की परिस लोखंडालासुद्धा सोनं बनवितो. ह्याचा अनुभव गुरुमाऊलीच्या सहवासात पदोपदी येत असतो. प्रसंग फार साधारण आहे पण तो घडला गुरुमाऊलीच्या सहवासात आणि म्हणूनच तो हृदयात कोरला गेला.

दिड महिन्याच्या महोत्सवाच्या वेळेची गोष्ट! गुरुपौर्णिमा उत्सवानंतर श्रीसस भागीरथी आईंच्या उत्सवासाठी माऊली पुण्याला जाणार होत्या. आदल्या दिवशी त्यांनी पाहिलं, स्वयंपाक घरात जवळ जवळ दोन अडीच किलो बीट होते. कोणतीही वस्तू वाया घालवायची नाही व तिचा योग्य वापर झालाच पाहिजे हा त्यांचा दृष्टीकोन आपल्यातही बाणवण्याचा त्यांचा प्रयत्न असतो. त्यांनी विचारलं, 'तुम्ही या बीटाचं काय करणार?' आम्ही सरळ उत्तर दिलं 'कोशिंबीर!' खरं तरं आम्हाला हे माहित होतं की तीन माणसांना रोजच्या रोज कोशिंबीर करून सुद्धा ते बीट संपणार नाहीत. माऊली म्हणाल्या, 'तुम्ही रोज कोशिंबीर खाल पण महाराजांना रोज नवीन पदार्थ हवा! बोला काय पदार्थ करणार?' झालं, रेश्मा गप्प! मग माऊलीच म्हणाल्या,'असं कर सगळ्या बीटांची सालं काढून मिक्सरमधून छान बारीक कर. जेवढ्यास तेवढी साखर घालून गॅसवर परतून घे.' सांगितल्याप्रमाणे सगळं व्यवस्थित केलं. पण किती वेळ शिजवायचं हेच कळेना. मग रेश्मा परतत राहिली आणि एक वेळ अशी आली की त्याची छान गुलाबी साखर बनली. झालं ती साखर बघून धस्सं झालं! आता काय करायचं? गुलाबी साखर, पदार्थ म्हणून पानात वाढायची? जे जाणकार होते त्यांना विचारलं. सगळे हसायचे आणि 'तुला माऊलींनी सांगितलय, तू बघ त्याचं काय करायचं ते' असं म्हणायचे.

सकाळी गावाला जाणार म्हणून आदल्या दिवशी रात्री अकरा वाजता माऊली सहज आल्या. हळूच रेश्माने सगळा प्रकार सांगितला. माऊली म्हणाल्या,'काही नाही. छान झालं. अर्धा पेला पाणी घाल. झाकण ठेवून शांत हो. मग मला सांग.'

दुसऱ्या दिवशी उत्सुकता होती. पदार्थाचं नक्की काय झालंय पहायची! मस्त बीटचा घट्ट असा जाम तयार झाला होता आणि चव तर अप्रतिमच होती.

पान नं. १३ वर

# गोजिरवाणी...✍

- सौ. नीता कुलकर्णी

**आजी** - आज कुठली गोष्ट सांगू बरं?

**गोट्या** - आजी, माझा एक मित्र बँकॉकला गेला होता. तर म्हणे त्याने तिथे बुद्धाची प्रचंड मूर्ती पाहिली व मला त्याची गोष्ट सांगितली.

**आजी** - हो? मग तूच सांग ना आज ती गोष्ट!

**गोट्या** - बरं. १९५७ साली एका मठातील काही संन्यासी बुद्धाची मूर्ती नवीन जागी हलवित होते. ती मूर्ती मातीची होती व खूप मोठी होती.

**मुले** - मग?

**गोट्या** - जेव्हा क्रेनच्या सहाय्याने बुद्धाची मूर्ती हलविण्याचा प्रयत्न करण्यात आला, तेव्हा असे लक्षात आले की तिच्या प्रचंड वजनामुळे तिला तडा जाऊ लागला.

**मुले** - बापरे, मग?

**गोट्या** - मठाधिपतीने मग ती मूर्ती परत जमिनीवर ठेवून तिला झाकून ठेवले. संध्याकाळी तो मुर्तीचे नुकसान तर झाले नाही ना म्हणून पहावयास गेला. त्याने जेथे तडा गेला होता तेथे टॉर्चने प्रकाश टाकला.

**मुले** - खूप तुटली होती का मूर्ती?

**गोट्या** - नाही, अरे त्याला असे जाणवले की मूर्तीच्या त्या भागातून प्रकाश परावर्तित झाला. पण त्यास वाटले की हे कसे काय शक्य आहे? मातीतून प्रकाश कसा काय बाहेर येईल?

**मुले** - कशाने तसे झाले?

**गोट्या** - मग त्याने तेथे जवळ जाऊन पाहिले तेव्हा त्यास काहीतरी चमकताना दिसले. मग त्याने छन्नी व हातोड्याने वरचा भाग काढायला सुरुवात केली.

**मुले** - मग त्यात काय होते?

**गोट्या** - अरे, थोड्या वेळातच त्यातून बुद्धाची सुवर्ण मूर्ती बाहेर पडली.

**मुले** - वा!

पान नं. १० वर



# भागिरथीच्या काठावर बसले असताना अंगावर उडालेले ज्ञानतुषार...✍

## सदाचार

२१) विशुद्ध केवल ज्ञानघन। निर्विशेष जो निरंजन।

एकचि परमानंदपूर्ण। ते तू अससी अद्वय।।२१।।

**अर्थ** - निर्मळ व केवळ ज्ञानपूर्ण, विशेषरहित व मायारहित असा जो पूर्ण परम आनंद आहे, तोच तू असून तू द्वंद्वातीतही आहेस.

**भावार्थ** - मागील श्लोकात तू देह नसून इंद्रिये, प्राण, मन व बुद्धी यांना पाहणारा आहेस असे वर्णन आहे. आता येथे तू कसा आहेस हे सांगितले आहे. तू निर्मळ म्हणजेच तुला उपाधीचा मळ लागलेला नाही. तू ज्ञानपूर्ण आहेस, म्हणजे तू विषयांच्या व मन बुद्धीच्या पलिकडे आहेस. मन-बुध्द्यादिकांना न जाणता येणारे असे तू जाणतोस. तू विशेषत्वाने भासत नाहीस, उघड दिसत नाहीस. तसेच तू निरंजन म्हणजेच मायारहित आहेस. तू एकमेव अद्वितीय असा असून परिपूर्ण आहेस, आनंद स्वरूप आहेस व तेच स्वरूप तू आहेस.

२२) जो शब्दाचे आदिअंती। मनाच्याही तेणेंचि रीती।

मध्ये साक्षी नित्य निश्चिती। तेचि तू हा टाकी भ्रम।।२२।।

**अर्थ** - शब्द उमटण्यापूर्वी जो आहे तो शब्द उमटल्यावरही आहे. तसेच मनाच्या बाबतीत आहे. तू मनाच्याही आदि अंती आहेस. मधल्या स्थितीत म्हणजेच शब्द उमटल्यावर किंवा मनास पाहणारा तू जरी असलास तरी तू फक्त तेवढाच आहेस हा भ्रम टाकून दे.

**भावार्थ** - जसे वाऱ्यामुळे गगनाची स्थिती काही बदलत नाही. तसेच शब्द उमटण्यापूर्वीही तू आहेस व शब्द उमटल्यावरही तू आहेस. मध्येही शब्दांना तू जाणतोस. तसेच मनाचेही आहे. मनाच्या आदि अंती तू आहेस व मनासही तू जाणतोस. म्हणून तू फक्त शब्दांना किंवा मनास जाणणारा आहेस हा भ्रम टाकून दे. तू अखंड आहेस.

२३) स्थूळ विराट एक रीती। सूक्ष्म हिरण्यगर्भाप्रती।

ऐक्य अज्ञान प्रकृती। प्रत्यक्ष विज्ञानपूर्णासी।।२३।।

**अर्थ -** स्थूळ - पिंडाचा, विराट - ब्रह्मांडाचा तसेच सूक्ष्म-पिंडाचा, हिरण्यगर्भ - ब्रह्मांडाचा व अज्ञान - पिंडाचा व अव्याकृत -ब्रह्मांडाचा असून जीवात्मा - पिंडाचा व परमात्मा -ब्रह्मांडाचा असे समानत्व येथे दाखविले आहे.

**भावार्थ -** येथे पिंड व ब्रह्मांडाचे समानत्व दाखविले आहे. जसा पिंडाचा स्थूळ देह जो अस्थि मांसाचा असून जड आहे, तसेच ब्रह्मांडाचा विराट देह आहे. तोही स्थूळाप्रमाणेच जड आहे. पिंडामध्ये जसा चंचल सूक्ष्म देह आहे तसाच ब्रह्मांडात हिरण्यगर्भ आहे, तोही चंचल आहे. पिंडामध्ये जसा अज्ञानदेह आहे तसाच ब्रह्मांडात अव्याकृत आहे. दोन्हीची स्थिती एकच असून दोन्ही अज्ञानरूपच आहेत. पिंडामध्ये जसा प्रत्यगात्मा तसाच ब्रह्मांडी परमात्मा आहे. दोन्हीही विज्ञानरूपच आहेत व अभेद आहेत.

---

पान नं. ८ वरून

**गोट्या -** अरे, तेराव्या शतकातील ती मूर्ती होती. शत्रूंच्या होणाऱ्या हल्ल्यापासून संरक्षण करण्यासाठी तिला मातीने झाकले होते. ज्या संन्याशांना हे गुपित माहित होते ते नंतर मरण पावले आणि म्हणूनच हे रहस्य अनेक शतके गुप्तच राहिले.

**आजी -** वा! छानच आहे गोष्ट! मुलांनो तुम्हाला काय कळले यातून?

**मुले -** नाही आजी काही समजत! तूच सांग ना!

**आजी -** अरे आपल्या प्रत्येकाच्या आत अशी सुवर्णमूर्ती दडलेली असते. फक्त ती आपल्याला माहित नसते. गुरुदेवांना याचे रहस्य माहित असते म्हणूनच ते त्यांच्या शाब्दिक छन्नी व हातोड्यांनी आपल्याला घडवितात व सुंदर बनवितात.

---

## गुंजारव - १

**- अदिती**

भक्तांच्या हाकेला गं देऊनी साद। भगवंताने माऊलीरूप घेतले साक्षात्।।धृ।।
आज दिनी देह धरी, प्रकटलासे भूवरी। मातापित्यांची कूस उजवी प्रकाशमय करी।
बाळगोपाळांचा मेळा जमवूनी मंदिरी। बोधितसे 'मी कोण' आनंद खरोखरी।।१।।
आता तरी विनंती करी अदिती प्रभूचरणी। सर्वांचा आधार सांभाळी माधुरी।
वैकुंठ अवतरले अवतरले अवनीवरी। गौराई नव्हे ती द्वारकापुरी।।२।।



# शब्द तेचि छेडिता...

**- मोहिनी**

का कळेना कोणत्या क्षणी हरवते मन कसे
उमलती कशा धुंद भावना अल्लद वाटे कसे
बंध जुळती हे प्रीतीचे, गोड नाते हे जन्मांतरीचे।।धृ।।
एक मी एक तू, शब्द मी गीत तू
आकाश तू, आभास तू, साऱ्यांत तू
ध्यास मी श्वास तू, स्पर्श मी मोहर तू
स्वप्नात तू, सत्यात तू, साऱ्यांत तू।।१।।
घडले कसे कधी, कळले न जे कधी
हळुवार ते आले कसे ओठावरी
दे ना तू साथ दे, हातात हात दे
नजरेतना नजरेतूनी इकरार घे।।२।।
का कळेना...'

'मुंबई-पुणे-मुंबई' सिनेमातल्या गाण्याचे सूर कानावर पडले आणि आतमध्ये प्रवास सुरु झाला. खरचं आपलेही असेच होते नाही का? आम्ही तर बोध घेतलेला असतो पण लगेच काही महाराजांच्या चरणांशी मन जडत नाही. पण एक क्षण असा येतो जो आपले सर्व हरवून टाकतो. आपल्या मनाचे हरण महाराज करतात व मग मात्र आम्ही खरे उमलतो आणि आम्हाला अलगद असण्याचा अनुभव येतो. कितीतरी प्रसंगातून महाराज आम्हास कसे अलगद ठेवतात याची प्रतिती येते व मग मात्र नक्कीच पटते की खरचं हे महाराजांशी जुळलेले बंध प्रीतीचे तर आहेतच पण हे नाते फक्त या जन्माचेच नसून त्या पलिकडचे आहे.

महाराज सांगतात तू आणि मी एकच आहोत. आपण महाराजांच्या गीतातले शब्द आहोत, म्हणजेच महाराजांचे एक अंग आहोत. महाराज कसे आहेत तर सगळीकडे! आकाशातही तेच आहेत व जेथे आभास होतो तेथेही तेच आहेत. श्वासात सोऽहं रूपाने ते आहेतच. त्याचाच ध्यास आपल्याला लागलेला असतो. आपल्या स्पर्शातही जाणीवरूपाने तेच आहेत. स्वप्नातही ते आहेतच. ते सत्यस्वरूप आहेत. म्हणूनच साऱ्यांमध्ये तेच आहेत.

हे सगळे कसे घडले ते आम्हाला कळलेच नाही आणि मग हळुवारपणे ओठावर उमटायला लागले (हास्यरूपाने, भक्तीत भिजलेल्या शब्दांमधून). माऊली, तू अशीच साथ आम्हाला दे. तुझ्या बरोबरच ही जीवनाची वाटचाल आम्हाला चालायची आहे. तू हातात हात दे, आमच्याकडून गुरुकार्य करवून घे! नजरेत म्हणजेच जी ज्ञानदृष्टी तू आम्हास दिली आहेस त्यातूनच तू आमचा स्वीकार कर. आम्हास सामावून घे. हे आमचे महाराजांशी जडलेले नाते नक्कीच देहाच्या पलिकडले आहे आणि म्हणूनच त्याला जन्माचे बंधन राहूच शकत नाही.

■■■

पान नं. ६ वरुन

पुणे जवळील सोनोरी येथे रा. कृष्णराव उर्फ नानासाहेब पानसे या नावाचे सद्गृहस्थ राहत असत. ते फार भगवत्प्रेमी होते. त्यांच्या कानावर बोवांची कीर्ति गेली, तेव्हा त्यांस बोवांच्या दर्शनाची उत्कंठा झाली. साडे येथील बाळू मारवाडी यांची भेट एकदा सहज नानासाहेब यास झाली. बाळू मारवाडी याने त्यास बलभीम बोवांविषयींची सर्व माहिती सांगितली, तेव्हापासून त्यांस बोवांस भेटण्याची फारच तळमळ लागली व त्यांनी आपले चिरंजीव विष्णुपंत यास घेऊन साडे मुक्कामी जाण्याचे ठरविले. परंतु इतक्यात त्यांस असे कळले की बोवांचे शिष्य गणपतराव तांबे हे त्यांस देवास मुक्कामी घेऊन गेले. नानासाहेब पानसे यांची जरी अशा प्रकारे निराशा झाली तरी बोवा पुन्हा साडे मुक्कामी येतील तेव्हा खास त्यांची भेट घेऊ असा त्यांनी निश्चय केला व ते नेहमी बोवांच्या शोधात राहिले.

बोवांचा प्रथमतः मुक्काम गणपतरावांबरोबर धार येथे झाला. तेथे काही दिवस राहून नंतर पुन्हा ते देवास येथे आले. देवास येथील मंडळी बोवा केव्हा परत येतात अशी वाट पहातच होती. बोवा येताच त्यांच्या कथा रा.ब. भिडे, छोटे पातीचे मासाहेब वगैरे ठिकाणी झाल्या. कथेत केवळ अद्वैतमताचें प्रतिपादन होत असून एकनाथ महाराजांच्या गाथ्यांतील रूपकांवर आख्याने लावीत असत. श्रोत्यांस रूपकाच्या सहाय्याने ज्ञानाचा बोध होऊन विषय चांगला समजला जात असे. देवास येथे काही दिवस राहून बोवा पुन्हा काही कामानिमित्त साडे येथे आले.

■■■



पान नं. ७ वरून

माऊलींची कुठलीच कृती सहज नसते. ती आपल्याला विचार करायला भाग पाडतेच. माऊली पुण्याला गेल्यामुळे प्रत्यक्ष बोलणं शक्य नव्हतं. पण आत चिंतन सुरु झालं.

वरचं साल हे पंचमहाभुतांचं! आतल्या सूक्ष्म देहात 'देह मी' भाव घेतल्याने तो कडक, टणक असतो. त्याला माऊली आपल्या पोथी, कथांच्या निरूपणातून अगदी छान बारीक करते. म्हणजे आपल्या मन बुध्द्यादिकांमध्ये उठणाऱ्या विचारांचे आपण बारकाईने विश्लेषण करायला लागतो. पण कडवटपणा तसाच असतो. मग माऊली आपल्या प्रेमाची साखर मिसळते आणि मगच खऱ्या अर्थाने ज्ञानाच्या आचेवर ठेवते. पण किती आच द्यायची ह्याची जाण शिष्याला नसते. अति अग्निने एक तर पदार्थ जसा करपतो किंवा कोरडा, भरभरीत होतो. तसेच ज्ञानाचे आहे. नुसतेच घेत राहिलो तर आतून कोरडे बनतो, सगळेच निरस वाटायला लागते किंवा त्या गुलाबी भुरभुरीत साखरे सारखे होते. फक्त शोभेसाठी वापर! म्हणजेच ज्ञानाचे छान छान शब्द वापरून सभेत शोभा आणता येते.

पण माऊली आपल्या बाळाला कोरडं कसं बनवेल? किंवा शोभेची बाहुली सुद्धा होऊ देणार नाही नुसते शब्दज्ञानी बनून! ती आपल्या प्रेमाचा शिडकावा करते, अनुभव देते तो सुद्धा गंमत आणि मजा यांच्या सोबतच! आणि मग मात्र जे काही तयार होते ते असते लाजवाब!

## गुंजारव - २

**- सौ. शुभांगी मोकाशी**

धावा सद्गुरु धावा। प्रेमे आठविते तुज देवा।।धृ.।।
दीनदयाळ सुखसिंधू तुम्ही। नाही जीवा विसावा।।१।।
गमलासी तू अंतर्यामी। तरी हुरहुर का वाटे जीवा।।२।।
तुझीच शक्ती तुझीच बुद्धी। का न करुनी घेई सेवा।।३।।
जनी वनी तूचि सर्वाठायी। परि चैन का न पडे जीवा।।४।।
कळकळ तुजला समजतचि नाही। म्हणोनी का ही दुरी बा।।५।।
कृपा कटाक्षाची आस लागली। बालका न करा परावा।।६।।
प्रेमामृताने न्हाऊ घाल बा। दे पायी विसावा।।७।।
शुभांगी माधुरी द्वैत नसता। का न ठाव उमजावा।।८।।
देवा धावा सद्गुरु धावा।

## तरुणाई...✍

- आरती

### तुम्ही हो बंधु सखा तुम्ही हो

Dearest Gurudev,

गुरुदेव आपको क्या कह कर संबोधित करना चाहिए यह समझ में नही आ रहा है, पर कुछ लिखना भी जरूरी है।

गुरुदेव सच कहूँ तो 'गुरुदेव' क्या चीज है इसकी समझ नही आती। **अभी पुने में हुए उत्सव** के बाद ज्यादा अहसास हो रहा है की गुरुदेव क्या क्या नहीं करते हमारे लिए! पर हमे कभी समझही नही आता। **'सहस्त्र अन्याय जरी त्वा केले क्षमा करील गुरु माय माय'।** सच में अहसास हो रहा है की कितना, कितना, कितना करते है गुरुदेव हमारे लिए! उसकी कोई सीमाही नहीं है।

गुरुदेव, डर लगता है कभी कभी, कोई गलती ना हो जाए और इसे खो ना दूँ। यह देहभावसे उठा विचार है, गलत है। गुरुदेव अपने शिष्योंको कभी छोडते नही, यह अभी तक अनुभव है। गुरुदेव, मेरे लिए **शारदा, सरस्वती** सब कुछ आपही है। इसलिए प्लीज कभी ऐसी **मती** मत होने देना की आपकी **आज्ञा पालन ना कर सकू।**

लता मौसी को लगा होगा क्या इसका हमेशा का नाटक है ''नहीं नहीं'' का। पर मौसी, गुरुदेव की तरफ से इतनी सुविधाँए मिलती है की खुद को भी शर्म आती है इस चीज की। आज थोडासा लग रहा था ट्रेनिंग के लिए मंदिर में कैसे रहूँ? पर मुंबई में आने के बाद कही ओर रहने की इच्छा नही होती। पता नही यह गलत है या सही!

गुरुदेव, सच में समझ नही आता की कहाँ पर गलती हो रही है, या नहीं। पर आपसे बिनती है की जहाँ भी मेरी गलती हो (पारमार्थिक, व्यावहारिक कोई भी) मुझे आप सीधा कान पकड कर भी बोलेंगे तो बुरा नहीं लगेगा। आप कभी महसूसही नहीं होने देते की क्या गलती हो रही है।

अभी लग रहा है **पूरा पत्र देहभाव से** लिखा है पर गुरुदेव सच में हमें अकल नही है की **'सगुणाच्या संगे कसं वागायचं?'**

गुरुदेव, यह जो उतराई वगैरा है ना, वह हम कर ही नही सकते। इन शब्दों का भी धन्यवाद कैसे करू समझ नही रहा है, जो आप तक यह सब कुछ पहुँचा रहें है।



गुरुदेव अगर सच में किसी के लिए कुछ मॉगने का मुझे मौका मिले तो मै **यही मांगुगी की उसे आप जैसे गुरुदेव मिले।**

और क्या कहूँ समझ नहीं रहा है, या कैसे व्यक्त करू की आप मेरे लिए क्या है। इसके लिए शब्द नहीं मिल रहे (यह व्यक्त करने की जरूरत भी नहीं है)। पर सच में **'तुम्ही दिन चढे, तुम्ही दिन ढले, तुम्ही हो बंधु सखा तुम्ही हो'।**

जय देवा...

आपकी
आरती

---

## उत्सव विशेष...

गोकुळाष्टमी उत्सव २०१३ श्रावण पौर्णिमा ते श्रावण कृ. अष्टमी

**मधुराष्टक**

अधरं मधुरं वदनं मधुरं नयनं मधुरं हसितं मधुरम्।
हृदयं मधुरं गमनं मधुरं मधुराधिपतेरखिलं मधुरम्।।१।।
वचनं मधुरं चरितं मधुरं वसनं मधुरं वलितं मधुरम्।
चलितं मधुरं भ्रमितं मधुरं मधुराधिपतेरखिलं मधुरम्।।२।।
वेणुर्मधुरो रेणुर्मधुरः पाणिर्मधुरः पादौ मधुरौ।
नृत्यं मधुरं सख्यं मधुरं मधुराधिपतेरखिलं मधुरम्।।३।।
गीतं मधुरं पीतं मधुरं भुक्तं मधुरं सुप्तं मधुरम्।
रुपं मधुरं तिलकं मधुरं मधुराधिपतेरखिलं मधुरम्।।४।।
करणं मधुरं तरणं मधुरं हरणं मधुरं रमणं मधुरम्।
वमितं मधुरं शमितं मधुरं मधुराधिपतेरखिलं मधुरम्।।५।।
गुंजा मधुरा माला मधुरा यमुना मधुरा वीची मधुरा।
सलिलं मधुरं कमलं मधुरं मधुराधिपतेरखिलं मधुरम्।।६।।
गोपी मधुरा लीला मधुरा युक्तं मधुरं मुक्तं मधुरम्।
दृष्टं मधुरं शिष्टं मधुरं मधुराधिपतेरखिलं मधुरम्।।७।।
गोपा मधुरा गावो मधुरा यष्टिर्मधुरा सृष्टिर्मधुरा।
दलितं मधुरं फलितं मधुरं मधुराधिपतेरखिलं मधुरम्।।८।।

श्री स.स. दत्तात्रेय गुरुज्ञान मंदिर, डी-७, दर्शन सोसायटी, प्लॉट नं. २, गोराई, बोरीवली (प) मुंबई ९२

BOOK-POST

To,

## संस्थेतील प्रमुख सप्ताह व उत्सव

**श्री स.स. दत्तात्रय महाराज जयंती उत्सव**
पौष कृ.१

**महाशिवरात्र उत्सव**
माघ कृ १३

**श्री स.स. भागिरथीनाथ पुण्यतिथी उत्सव**
रंगपंचमी फाल्गुन वद्य ५

**नृसिंह जयंती उत्सव**
वैशाख शु. १३

**गुरुपौर्णिमा उत्सव**
आषाढ शु. १५

**श्री स.स. माधुरीनाथ वाढदिवस उत्सव**
श्रावण शु. १३ परम १४

**श्री स.स. दत्तात्रय महाराज पुण्यतिथी उत्सव**
कार्तिक कृ. १
दि. १० नोव्हें. ते १९ नोव्हें २०१३

## मंदिरात केले जाणारे अन्य उपक्रम

| | |
|---|---|
| **श्री स.स. बलभीममहाराज जयंती** | - गुढीपाडवा - चैत्र शु. १ |
| **श्री स.स. लक्ष्मणमहाराज जयंती** | - वसंतपंचमी - चैत्र शु. ५ |
| **श्रीरामनवमी** | - चैत्र शु. ९ |
| **श्री स.स. नारायण महाराज जयंती व पुण्यतिथी** | - आषाढ कृ. ५ |
| **श्री स.स. भागिरथीनाथ जयंती** | - आषाढ व. १५ दीप अमावस्या |
| **श्रीकृष्णजयंती** | - श्रावण कृ. १ ते ८ |
| **श्री स.स निरंजनस्वामी पुण्यस्थिती** | - परिवर्तीनी एकादशी- भाद्रपद शु. ८ |
| **श्री. स.स. बलभीममहाराज पुण्यतिथी** | - इंदिरा एकादशी - भाद्रपद व. ११ |
| **नवरात्र** | - अश्विन शु. १ ते ११ |
| **श्री स.स. निरंजनस्वामी जयंती** | - कार्तिक शु. ८ |
| **श्रीदत्तजयंती** | - मार्गशीर्ष १५ |
| **दासनवमी** | - माघ व.१ ते ९ |